शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सांगली जिल्हयातील सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**महोदय/महोदया,**

भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनांचे अर्ज तात्काळ सादर करणेबाबतचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सांगली यांचे जा.क्र.सआसकसां/भासशि/विजाभज,इमाव, विमाप्र-ऑफलाईन शिष्यवृत्ती २०१७-१८/१३३५, दि.२६/०२/२०१८ चे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविले आहे. त्यानुसार तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

कळावे,

आदेशान्वये,
उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 40
दि. 6 MAR 2018

# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सांगली

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,जुना बुधगांव रोड,सांगली-416416

दुर.क्र. 0233-2374739 E-mail:acsangli2016@gmail.com

जा.क्र.सआसकसां/भासशि/विजाभज,इमाव,विमाप्र-ऑफलाईन शिष्य...8/ 1335 सांगली दि.26.02.2018

SHIVAJI UNIVERSITY
3 MAR 2018
686
PS

प्रति,

मा.कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

**विषय**:- भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क प्रतीपूर्ती योजनांचे अर्ज सादर करणेकरता सांगली जिल्हयातील महाविद्यालयांना सूचना निर्गमित करणेबाबत...

**संदर्भ**:- शासन परिपत्रक,विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र.इबीसी 2017/प्र.क्र.34/शिक्षण दि.09 जानेवारी 2018

**महोदय,**

महाराष्ट्र शासनाकडून अनुसूचित जाती,विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्यांचे शालांत परीक्षोत्तर शिक्षण पुर्ण करणेमध्ये सहाय्य् करणेसाठी भारत सरकार शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना व राज्य सरकार पुरस्कृत शैक्षणिक शुल्क प्रतीपूर्ती योजना राबविल्या जातात. सदरील योजनेंतर्गत निर्वाह भत्ता,शिक्षण शुल्क,परीक्षा शुल्क व इतर शुल्काची रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न खात्यावर वर्ग करणेत येते. शासन निर्णय दि.1.11.2003 अन्वये विद्यार्थ्यांचे अर्ज भरून या कार्यालयाकडे सादर करणे ही संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची जबाबदारी आहे.

संदर्भिय शासन परिपत्रकान्वये सन 2017-18 या वर्षामध्ये विजाभज,इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी उपरोक्त योजना ऑफलाईन पध्दतीने राबवणेबाबत शासन आदेश प्राप्त आहेत. तदनुषंगाने सांगली जिल्हयातील सर्व शासकीय, अनुदानित, शासनमान्य विनाअनुदानित व कायमस्वरूपी विनाअनुदानित महाविद्यालयांना पत्रव्यवहारादवारे, बैठकीमध्ये व दुरध्वनीद्वारे वारंवार सूचना देऊन शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क प्रतीपूर्ती या योजनांचे अर्ज तात्काळ सादर करणेबाबत सूचित करणेत आलेले आहे. तथापि,सांगली जिल्हयातील महाविद्यालयांकडून उपरोक्त योजनांचे अर्ज या कार्यालयाकडे सादर करणेमध्ये प्रतिसाद अत्यल्प असल्याने सदरील योजनांची अंमलबजावणी करणेमध्ये व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देणेमध्ये विलंब होत आहे. दरवर्षी प्राप्त् होणाऱ्या अर्जांचा विचार करून उपरोक्त योजनांसाठी शासनाकडून आवश्यक आर्थिक तरतुदीची मागणी करणेत आलेली आहे व प्राप्त तरतुद दि.31 मार्च 2018 पुर्वी खर्ची टाकणे आवश्यक आहे. सदरील मुदतीत महाविद्यालयांकडून अर्ज प्राप्त न झालेस प्राप्त तरतुद समर्पित करावी लागण्याची व मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेच्या लाभापासून वंचित राहणेची शक्यता नाकारता येत नाही. प्राचार्यांच्या अनास्थेमुळे शिष्यवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीमध्ये होणारा विलंब मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर विपरित परिणाम करणारा ठरत आहे.

तरी, सांगली जिल्हयातील आपल्या अधिनस्त सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना उपरोक्त योजनांचे अर्जांवर कार्यवाही करून या कार्यालयास तात्काळ सादर करणेबाबत आपल्या स्तरावरून आदेश पारित व्हावेत,ही विनंती आहे.

आपला विश्वासू,

(सचिन कवले)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण,सांगली

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:** मा.प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण,पुणे विभाग,पुणे

SHIVAJI UNIVERSITY
Vice-Chancellor's Office
3 MAR 2018
Inward No. 686
To Whom Registrar



Shivaji University, Kolhapur
Inward No. 3761
Date 05/03/2018